# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
# वास्तुशास्त्रज्ञाची (Architect) व प्रकल्प सल्लागाराची पॅनेलवर नियुक्ती करण्याबाबत...

विधान भवन, मुंबई येथील दालनांचे/कक्षांचे नुतनीकरण, विधानसभा, विधानपरिषद व मध्यवर्ती सभागृहाच्या नुतनीकरणाची कामे त्याचप्रमाणे नव्याने बांधकाम इत्यादी स्वरूपाची कामे नियोजित पध्दतीने करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी इमारती प्रकल्प: अन्वेषण, वास्तुरचना, अंदाजपत्रके इत्यादी भूसंपादन प्रस्ताव पुनर्वसन, प्रकल्पाचे वातावरण व सामाजिक परिणाम व Project management consultant (PMC) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार याकरीता ५% शुल्क अनुज्ञेय राहिल असे कळविले आहे. सदर टक्केवारीच्या अनुषंगाने उपरोक्त कामांकरिता पॅनेलवर नियुक्ती करण्याच्या दृष्टीने व्यक्ती व संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

विधान भवन, मुंबई येथे नियुक्त करण्यात येणाऱ्या वास्तुशास्त्रज्ञाकडे व सल्लागारांकडे खालील कामांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१. शासकीय कार्यालय, शासकीय निवासस्थान, शासकीय विश्रामगृहाच्या बांधकामासंदर्भातील कामाचा १५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
२. पुरातन, ऐतिहासिक वास्तुच्या डागडुजी/दुरुस्ती/नूतनीकरण अशा कामांचा कामाचा १५ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
३. पुरातत्व इमारतीतील दुरुस्तीबाबत अथवा वास्तुशास्त्रात विशेष प्राविण्य असल्यास त्यास प्राधान्य देण्यात येईल.
४. नियुक्ती तीन वर्ष कालावधीकरिता राहील.

सदर कामाकरिता इच्छुकांनी आपले प्रस्ताव मोहरबंद पाकीटातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक २४ जुलै, २०२५ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

प्रस्ताव स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणांस कळविण्यात येईल. मात्र कोणताही प्रस्ताव स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे, कृपया यांची नोंद घ्यावी.

**सचिव-४**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई-४०० ०३२.**